सीपीटीपी-३ अंतर्गत रुजु झालेल्या परिविक्षाधीन सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्या प्रशिक्षण वेळापत्रकातील सुधारणांबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०४१६/प्र.क्र.२००/परि-४**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
तारीख: १२ फेब्रुवारी २०१८

वाचा -

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-२०१३/प्र.क्र.८४/१३/ १२-अ, दि. २०.०१.२०१४.
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-२०१६/प्र.क्र.३३/१६/ १८-ब, दि. १६.०४.२०१६.
३) सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र.टिआरएन ०३१६/प्र.क्र.३८/१६/१८-ब दिनांक १९.०५.२०१६.
४) शासन निर्णय क्र.एमव्हिडी-०४१६/प्र.क्र.२००/परि-४, दि.२५.०५.२०१६
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. टिआरएन-०२१६/प्र.क्र.५८/सीपीटीपी, दिनांक ०४.०१.२०१७.
६) परिवहन आयुक्त कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र. का.आ.क्र.०५/ पआका/का१३/प्रशिक्षण-१६/२०१७/जा.क्र.५०६५, दि. २७.३.२०१७
७) सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र.टिआरएन०११८/प्र.क्र.०७/सीपीटीबी-ब, दिनाक २०.०१.२०१८.

शासन निर्णय:-

राज्यसेवा मुख्य परिक्षा २०१५ च्या अंतिम निकालाच्या आधारे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी - ब या संवर्गामध्ये शिफारस केलेल्या उमेदवारांचे एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम- ३ चे प्रशिक्षण दि. ०२.०५.२०१६ पासून दोन वर्षासाठी वनामती, नागपूर येथे सुरु झाले आहे. सध्या संदर्भ क्र. ५ वरील परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दि. २७.०३.२०१७ रोजीच्या कार्यालयीन आदेशाच्या अनुषंगाने ५२ आठवड्याचे विभागीय जिल्हा संलग्नता प्रशिक्षण कार्यक्रम सुरु आहे. सदर ५२ आठवड्याचा प्रशिक्षण कालावधी दि. २१.०१.२०१८ रोजी पुर्ण होणे अपेक्षित होते. तथापि सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भ क्र. ५ वरील दि. ०४.०१.२०१७ च्या शासन निर्णयान्वये काही सुधारणा करण्यात आल्या होत्या. सदर सुधारणांमुळे पुर्व नियोजित वेळापत्रकामध्ये बदल करण्यात आला आहे. उक्त सुधारित वेळापत्रक खालील प्रमाणे

| प्रशिक्षण टप्पा | कालावधी |
|---|---|
| खातेनिहाय जिल्हा संलग्नता | दि. २५.०२.२०१८ पर्यंत. |
| सुट्टी | दि.२६.०२.२०१८ ते दि. ०३.०३.२०१८ |
| दिल्ली व महाराष्ट्र दर्शन | दि. ०४.०३.२०१८ ते दि. १८.०३.२०१८ |
| पुनर्विलोकन व उजळणी | दि. १९.०३.२०१८ ते दि. ०१.०४.२०१८ |
| खातेनिहाय संलग्नता पुढे चालू | दि. ०२.०४.२०१८ ते दि. ३०.०४.२०१८ |

२. सदर सुधारित वेळापत्रकानुसार एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम- ३ अंतर्गत रुजु झालेल्या एकुण ८ परिविक्षाधीन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचा खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणाचा कालावधी २५.०२.२०१८ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

३. खातेनिहाय जिल्हा संलग्नता प्रशिक्षणाचा टप्पा दि. २५.०२.२०१८ रोजी संपत असल्याने त्यांना त्याच दिवशी म्हणजेच दि. २५.०२.२०१८ रोजी. (म. नं.) कार्यमुक्त करावे.

४. परिविक्षाधीन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिका-यांना YCMOU नाशिक येथे महाराष्ट्र अभ्यासदौरा या प्रशिक्षणासाठी दि. ०४.०३.२०१८ रोजी रुजु होण्याच्या सुचना द्याव्यात.

५. पुनर्विलोकन व उजळणी या टप्प्याच्या प्रशिक्षणानंतर त्यांना पुन्हा सध्य:स्थितीत ते ज्या पदावर कार्यरत आहेत त्याच पदावर रुजु करुन घेण्यात यावे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१२११४७४२३३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.02.12 11:51:49 +05'30'

(द.ह.कदम)

अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (सर्व संबंधित परिविक्षाधीन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देऊन त्याची पोच शासनास सादर करावी.)

२. प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर (शहर)/ नागपूर (ग्रामीण)/अमरावती/लातूर/पुणे/मुंबई (मध्य)/पनवेल/औरंगाबाद.

३. वरिष्ठ प्रशासन व लेखा अधिकारी, वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, नागपूर.

४. उप सचिव (सीपीटीपी), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.

५. निवडनस्ती- परिवहन-४.